तरुण भारत
Apla Nagpur | 2025-02-01 | Page- 6
epaper.tarunbharat.net

# चित्ररथाद्वारे संविधानाबाबत जनजागृती

## दहाही झोनमध्ये अभियानाला उदंड प्रतिसाद

◆ नागपूर, ३१ जानेवारी

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त समाजकल्याण विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या भारतीय संविधानावर आधारित चित्ररथाच्या माध्यमातून महानगरपालिकेद्वारे संपूर्ण शहरात जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हिरवा झेंडा दाखवून चित्ररथाचा शुभारंभ केला. मनपा आयुक्त व प्रशासक डॉ. अभिजित चौधरी यांच्या मार्गदर्शनात व समाज कल्याण विभागाच्या सहायक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांच्या नेतृत्वात या चित्ररथाच्या माध्यमातून दहाही झोनमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.



समाजकल्याण विभागातर्फे तयार केलेला संविधानावर आधारित हाच तो चित्ररथ

भारतीय संविधानाबाबत जागरूकता तसेच घटनात्मक अधिकार व कर्तव्यांबद्दल नागरिकांमध्ये जागरूकता वाढविण्यासाठी संविधान अमृत महोत्सवाची शहरात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी समाजकल्याण विभागातर्फे संविधान चित्ररथ तयार करण्यात आला असून, या माध्यमातून २७ जानेवारीपासून दररोज शहराच्या विविध भागांत झोननिहाय जनजागृती केली जात आहे.

◀ *(तभा वृत्तसेवा)*

Powered by iDocuments